मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज


अंक ४५ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● मार्च २००१

(व्यक्तीची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## पुण्यस्मरण : कै. सुरेशभाऊंचे

*११.२.२००१ रोजी आयोजित कै. सुरेशभाऊ पुण्यस्मरण-सांस्कृतिक कार्यक्रमातील कार्यवाह विनायक केशव यांचे प्रास्ताविक*



सर्वोत्कृष्ट स्मरण कोणतं? स्मरणीय व्यक्तीच्या आवडत्या गोष्टींचं आणि त्याच्या कर्तृत्वाचं स्मरण? की त्या व्यक्तीच्या अपुऱ्या आशा आकांक्षा पुऱ्या करण्याचा प्रयत्न करणं, त्या व्यक्तींनी सुरू केलेले उपक्रम चालू ठेवण्यासाठी धडपड करणं हे सर्वोत्कृष्ट स्मरण. पहिल्या प्रकारचं स्मरण हे केवळ भावनेवर आधारलेलं असतं तर दुसऱ्या प्रकारचं स्मरण हे कर्तृत्वावर आधारलेलं असतं.

मराठे प्रतिष्ठानचे केवळ भूतपूर्व अध्यक्षच नव्हे तर प्रतिष्ठानचे सर्वस्व कै. सुरेशभाऊ आपल्याला सोडून एक वर्षाचा कलावधी उलटला.

मराठे प्रतिष्ठानच्या संदर्भात कै. सुरेशभाऊंच्या काही अपेक्षा होत्या. कवीच्या भाषेत बोलायचे झाले तर त्यांची काही स्वप्ने होती. माणसाची सर्वच स्वप्ने पुरी होत नाहीत. कारण कर्तृत्ववान पुरुषांची स्वप्नेसुद्धा भव्य असतात, लांब पल्ल्याची असतात. ''आकांक्षापुढती जिथे गगन ठेंगणे'' अशी!

कै. सुरेशभाऊंच्या सुद्धा काही अपेक्षा होत्या. मराठे कुलबांधवांच्या जीवनात शक्य तो सहभागी होणं, त्यांच्या मुलाबाळांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करणं, हुषार विद्यार्थ्यांचं जाहीर कौतुक करणं. हितगुजच्या द्वारे त्यांच्याशी सतत संपर्क ठेवणं. त्यांच्या मुलाबाळांना नोकरीच्या मृगजळापासून दूर नेऊन त्यांना उद्योग-प्रवण करणं, केवळ बौद्धिक व आर्थिक क्षेत्रातच नव्हे तर नाना तऱ्हेच्या कला - क्रीडा क्षेत्रात यश प्राप्त करून देण्यासाठी मार्गदर्शन करणं, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजून कुलबांधवांच्या कौशल्याला दाद देणं, या काही केवळ त्यांच्या अपेक्षा नव्हत्या वा स्वप्ने नव्हती. त्यांनी गेल्या दहा-बारा वर्षात त्यासाठी खूप परिश्रम घेतले. माणसं गोळा केली. साडेनऊशे पृष्ठांचा प्रचंड कुलवृत्तांत कुलबांधवांच्या हाती दिला. त्यांच्या अपेक्षा, त्यांची स्वप्ने आपल्याला पूर्ण करायची आहेत. त्यासाठी आपण काय केलं, काय केलं पाहिजे याचा आढावा घेऊन उपक्रम आखणं हीच कै. सुरेशभाऊंना आदर्श आदरांजली ठरेल.

या प्रसंगी मराठे प्रतिष्ठानचा कार्यवाह या नात्याने अध्यक्षांच्या अनुमतीने मी अगदी थोडक्यात आढावा घेतो. आपले कुलबंधु व धडाडीचे कार्यकर्ते श्री. सी. गो. खांबेटे हे संगणकतज्ञ आहेत त्यांनी कुलवृत्तांताच्या संगणकीकरणाच्या कार्याला सुरवात केली आहे. अर्थात यामध्ये कुलवृत्तांत अद्ययावत करण्याचा भागही येतो. हे काम कधी संपणारे नाही आणि लोकांच्या नजरेत येण्यासारखेही नाही. पण ते आवश्यक आहे. त्याशिवाय कोषाध्यक्ष या नात्याने प्रतिष्ठानच्या आर्थिक चाव्या त्यांच्या कमरेला, नव्हे त्यांच्या खिशांत आहेत. या दोन अश्वांवर स्वार होण्याचं कसब त्यांच्या ठिकाणी आहे. शिवाय इतर अनेक प्रकारची कामं ते स्वतः होऊन स्वीकारतात.

हितगुजची वाटचाल आपण पहातच आहात. दर तीन महिन्यानी येणारा हा पाहुणा - छे पाहुणा कसला? हवाहवासा वाटणारा मित्रच नाही कां?

## मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

**श्री. लक्ष्मणराव** हे हितगुजचे सबकुछ आहेत.

शैक्षणिक मदत आणि, पारितोषिक या बाबतीत स्वतःचं कौतुक स्वतःच करण्याचा आक्षेप सहन करूनसुध्दा मी विश्वासपूर्वक सांगतो की कोणत्याही गरजू विद्यार्थ्याला आम्ही विन्मुख परत पाठवीत नाही. वैद्यकीय मदतीसाठी आलेली विनंती आम्ही आमच्या कुवतीनुसार मान्य करतो.

मराठे कुटुंबातील तरुण कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांच्या पाठीवर शाबासकी देण्यासाठी वर्षातून निदान एकदा तरी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केलाच पाहिजे हा कै. सुरेशभाऊंचा आग्रह होता. हे लक्षात घेऊन गेल्या वार्षिक सभेत कै. सुरेशभाऊ स्मृती निधी स्थापन करण्यात आला आहे. सर्व कुलबांधवानी या निधीला उत्स्फूर्तपणे मदत करावी.

आपण सर्वजण प्रतिष्ठानावरील प्रेमापोटी व कै. सुरेशभाऊंना आदरांजली वाहण्यासाठी सर्व कामे बाजूला सारून आलात याबद्दल प्रतिष्ठानतर्फे मनःपूर्वक आभार.

★★★

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ सभा

महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. तसेच चौथ्या शनिवारी गरजेनुसार कार्यकारी मंडळ आणि उपसमित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा घेण्यात येते.

मागील तिमाहीत ९ व २३ डिसेंबर, १३ जानेवारी आणि ७ फेब्रुवारी रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. कार्यकारी मंडळ सदस्याशिवाय ९ डिसेंबरच्या सभेला **विश्वस्त श्री. आनंद यशवंत** (पृ. २७७), तसेच २३ डिसेंबरच्या सभेला **माजी विश्वस्त मोहन सदाशिव** आणि २३ डिसेंबर, १३ जानेवारी व ७ फेब्रुवारीच्या सभेला ११-२-२००१ च्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे संयोजक **सदानंद विष्णु** तथा भाऊ मराठे (पृ. ५०७) हेहि उपस्थित होते. २३ डिसेंबरच्या सभेत कार्यक्रमाची रूपरेषा आखण्यात आली आणि ७ फेब्रुवारीच्या सभेत सांस्कृतिक कार्यक्रमाची पूर्ण व्यवस्था पक्की करण्यात आली.

**सार्वजनिक गणेशोत्सव**
**कसा असावा? कसा नसावा?**

*या विषयावर आपले विचार पाठवण्याचे आवाहन सप्टेंबर २००० च्या हितगुजमध्ये करण्यात आले होते. वाचकांचे हे विचार पुढील (जून २००१) हितगुजमध्ये प्रसिद्ध करण्यात येतील.*

*अजूनहि ज्यांना याविषयी आपले विचार मांडायचे असतील त्यांनी ते एप्रिल २००१ पर्यंत पाठवावे. - संपादक.*

**एकमेकां साह्य करू**

### जागा नाही म्हणून लग्न लांबवणाऱ्यांसाठी खूषखबर

पुष्कळ वेळा जागा नाही म्हणून काही मुले लग्न लांबवतात किंवा करीत नाहीत. मराठे प्रतिष्ठानच्या कपिकुलातील कुणाही मुला मुलीची अशी अडचण असल्यास ती दूर करण्यासाठी मी प्रयत्न करीत त्यांत सर्वप्रथम माझी स्वतःची जागा त्यांना वापरता येईल. ही जागा परांजपेनगर कोफराड येथे आहे. तिच्यात आवश्यक त्या सर्व सुविधा आहेत. कसलाही संकोच न करता गरजूंनी संपर्क साधावा. **पत्ता :** जनार्दन गोविंद मराठे, अे ७/२२३ परांजपेनगर, कोफराड, पोष्ट आगाशी, पिन - ४०१ ३०१. दूरभाष - ५८८ ६९५.

## सांस्कृतिक कार्यक्रम

दि. ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ७ या वेळात प्रभादेवी येथे मराठे उद्योगभवनात हा कार्यक्रम झाला. कुलबांधवांप्रमाणेच सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार विकास सबनीस यांचा या कार्यक्रमातला सहभाग ही विशेष उल्लेखनीय बाब. सविस्तर वृत्तांत याच अंकात छापला आहे.

## कार्यालय व्यवस्थापक

प्रभादेवी, दादर येथील सभासद **मधुकर कृष्ण** (पृ.१५९) यांनी कार्यालयीन कामकाजासाठी मंगळवार व गुरुवारी नियमितपणे प्रतिष्ठानच्या कार्यालयात येण्याचे मान्य केले होते. मात्र काही घरगुती अडचणींमुळे त्यांना ते शक्य नसल्याचे आता त्यांनी कळविले आहे.

प्रभादेवीच्या जवळपास राहणाऱ्या कुलबांधवांपैकी कोणीतरी ही जबाबदारी स्वीकारण्यास आपण होऊन पुढे यावे असे आवाहन आहे.

## Surprise Test : Prize

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवशी घेतलेल्या प्रश्नमंजूषा चाचणी परीक्षेत **सुकृत विनायक खांबेटे** (पृ. ६९४) आणि **रोहित माधव** (पृ. २३५) या दोघांनीही १० पैकी ७ गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्यांचे पेपर आणि पारितोषिके पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी देण्यात येतील असे **डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** (पृ. २८४), निमंत्रक शिक्षण समिती, यांनी कळविले आहे.

## वैद्यकीय मदत

वेंगुर्ले येथील कुलभगिनी लक्ष्मी बाळकृष्ण यांचेवर व्हावयाची शस्त्रक्रिया आणि औषधोपचार यासाठी मदतीचा अर्ज साप्ताहिक 'किरात'चे संपादक श्रीधर केशव यांच्या शिफारसीसह आला होता. त्यांना रु. ५,००० वैद्यकीय मदत देण्यात आली.

## कै. सुरेशभाऊ स्मृति निधी देणग्या

मागील तिमाहीत खालील देणग्या मिळाल्या.

१) अरुण दत्तात्रय, पुणे रु. २०००
२) कालिदास बाळकृष्ण, गोवा रु. ११००
३) सुधाकर नरहर, मुंबई रु. १००१
४) वसंत रावजी, खुडीपाट रु. १०१

## हितगुज निधी देणगी

१) गजानन भास्कर, घाटकोपर मुंबई.
तरुणांच्या लेखन स्पर्धेसाठी रु. १००१

★★★




Marathe Pratishthan

# कै. सुरेशभाऊ मराठे स्मृति प्रीत्यर्थ सांस्कृतिक कार्यक्रम (११.२.२००१)

- **विनायक केशव** (पृ. २०), कार्यवाह मराठे प्रतिष्ठान, मुंबई.

कै. सुरेशभाऊ यांना कला, क्रीडा आणि उद्योग या क्षेत्रांबद्दल विलक्षण आस्था होती. दरवर्षी निदान एक तरी सांस्कृतिक कार्यक्रम, आणि उद्योग प्रेरणा बाबत एखादा कार्यक्रम वा उपक्रम या गोष्टी पार पाडण्याबाबत त्यांचा आग्रह होता. कारण या गोष्टींमुळेच प्रतिष्ठानची प्रतिष्ठा टिकून राहील व इतर उपक्रमांबाबत कुलबांधवांचा सहभाग लाभेल असा त्यांचा विश्वास होता.



मोहन सदाशिव यांचा नाणीसंग्रह पाहून थकला भागलेला बालप्रेक्षक

या गोष्टी लक्षात घेऊन गेल्या वार्षिक सभेत कै. सुरेशभाऊ स्मृति निधी स्थापन करण्यात आला आणि वर्षातून निदान एकदा सांस्कृतिक कार्यक्रम, शक्यतो कै. सुरेशभाऊ यांच्या स्मृतीदिनाच्या आसपास, आयोजित करावा असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि. ११ फेब्रुवारी २००१ रोजी मराठे उद्योग भवन येथे सायं. ४ ते ७ या वेळात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरवातीला कै. सुरेशभाऊ यांच्या प्रतिमेला प्रतिष्ठानचे **विश्वस्त श्री. अरविंदराव** यांनी पुष्पहार अर्पण केला व दोन मिनिटे स्तब्धता पाळून आदरांजली वाहण्यात आली.

प्रतिष्ठानचे **कार्यवाह श्री. वि. के. मराठे** यांनी प्रास्ताविक करताना सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रायोजन विशद करून प्रतिष्ठानच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला.

**श्री. भाऊ मराठे** (सदानंद विष्णु, पृ. ५०७) यांनी कै. सुरेशभाऊ यांच्या कार्याचा आदरपूर्वक उल्लेख करताना एक योगायोगाची गोष्ट नमूद केली. हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी हॉलसाठी खूप खटपट केली. पण लग्नसराई असल्यामुळे कोठेही जागा मिळू शकली नाही व या कार्यक्रमाचे आयोजन मराठे उद्योगभवन येथेच करावे लागले. कै. सुरेशभाऊंच्या उपस्थितीत बहुतांश कार्यक्रम मराठे उद्योग भवन या कै. सुरेशभाऊंच्या भव्य वास्तूतच पार पडले. कदाचित हा सांस्कृतिक कार्यक्रम या वास्तूतच पार पडावा ही त्यांची इच्छा असावी.

**सौ. मंजिरी मराठे** या दूरदर्शनवर वृत्त-निवेदक म्हणून बरीच वर्षे काम करीत आहेत. त्यांनी दूरदर्शनमध्ये काम करीत असताना आलेल्या अडचणी, गमतशीर प्रसंग आपल्या ओघवत्या भाषेत खुलवून सांगितले. हे ऐकताना आपण जणू सौ. मंजिरीताई बरोबर दूरदर्शनच्या वृत्तविभागात वावरत आहोत व तेथे घडलेल्या गंमतींचे साक्षीदार आहोत असा भास होत होता. सौ. मंजिरी नुसत्या कुशल वृत्तनिवेदिकाच नाहीत तर दर्जेदार कथाकथनकारही आहेत याची खात्री पटली.



मंजिरी मराठे

त्यानंतर प्रतिष्ठानचे **विश्वस्त श्री. अरविंदराव यांची नात कुमारी सदया मयेकर** मंचावर आली. श्री. भाऊनी या मुलीचं खूप कौतुक केलं. लिंकन यानी त्यांच्या गुरुजींना लिहिलेल्या काव्यमय पत्राचा मजकूर सदयाने मराठी भाषेत सांगितला. ***(हे पत्र पुढील अंकात वाचावे. - संपादक)*** छे. सांगितला हा फारच अपुरा शब्द वाटतो. खरं म्हणजे या चिमुरड्या मुलीने श्रोत्यांना प्रत्येक वाक्याला दाद देण्यास भाग पाडले. तिने ते पत्र सजीवच केले. पत्रामधला मजकूर सादर करताना आवाजातील चढउतार, किंचित विश्राम, हावभाव ही सगळी आयुधं तिनं सफाईने वापरली. नंतर आईच्या एका कवितेचं वाचन करून टाळ्यांच्या गजरात सदया आपल्या जागेवर गेली. ***(कविता मयेकर यांची ही कविता या अंकात छापली आहे. - संपादक)***



भाऊ मराठे

मराठे प्रतिष्ठानचे जेष्ठ सभासद, **माजी विश्वस्त श्री. मोहनराव मराठे** हे सेवानिवृत्तीनंतर परत मुंबईत स्थायिक झाले आहेत. त्यानी आपली संग्राहक वृत्ती चांगलीच जोपासली आहे. पोष्टाची तिकिटे, नाणी, काडेपेट्या यांचा आंतरराष्ट्रीय संग्रह त्यानी केला आहे. या वस्तूंचं देखणं प्रदर्शन सभासदानी, उपस्थितांची चांगलीच दाद मिळवून गेलं. भाऊंनी श्री. मोहनरावाना मोठ्या शर्थीने बोलके केले,



सदया मयेकर



Marathe Pratishthan

कारण मोहनरावांचं कर्तृत्व जरी मोठं असलं, हात जरी सढळ असला, तरी ते मितभाषी आहेत. त्यातून स्वतःविषयी, ते सुद्धा चारचौघात, बोलणं म्हणजे एक तऱ्हेचं संकटच. मोहनरावानी या सुंदर संग्रहाचं श्रेय स्वतःकडे घेण्यास फारच संकोच केला. झालं ते सहजच झालं, मुद्दाम संग्रह करायचा म्हणून केलं नाही हेच ते वारंवार म्हणत होते. स्वतःचं स्वत्व टिकवून नोकरी, ती सुध्दा बड्या बड्या राजकारणी व्यक्तींच्या निकट सहवासात राहून करणं हे किती कठीण आहे हे त्यानी काही उदाहरणे देऊन स्पष्ट केलं.

त्यानंतर एक तरुण कुलबांधव **राकेश चक्रदेव** याने ढोलकीच्या तालवाद्यावर सुंदर बोल सादर केले. निरनिराळ्या लयीत व ठेक्यात त्याने नादब्रह्म उभे केले. सर्व उपस्थितांनी त्याचे टाळयांच्या गजरात कौतुक केले.

या भारावलेल्या वातावरणात भाऊंच्या अंगी भिनलेला कलाकार त्याना अस्वस्थ करून सोडीत होता. शेवटी **भाऊंनी हातातला माईक सरसावला** आणि थोर कलाकारांच्या हृद्य आठवणी, मन हेलावून टाकणारे प्रसंग तितक्याच तन्मयतेने सादर केले. रंगवून म्हणू कां खुलवून म्हणू? कोणताही शब्द वापरा त्यांची तन्मयता शब्दांत थोडीच मावणार आहे?

त्यानंतर कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण **श्री. विकास सबनीस त्यांच्या आयुधांसह श्रोत्यांसमोर अवतरले.** श्री. विकास आणि सौ. विकास सबनीस ज्यावेळी त्यांच्या आयुधांची मांडामांड करीत होते, त्यावेळी मला कोणता भास झाला सांगू? वधू-वर बोहल्यावर चढण्यापूर्वी गुरुजींची धावपळ चालू असते किंवा वाङ्निश्चय वा सीमंतपूजन सुरू होण्यापूर्वी गुरुजींची मांडामांड चालू असते त्याचा भास झाला.

सबनीसांची खासियत म्हणजे त्याना ब्रश हातात घेण्यापूर्वी पेन्सील, कार्बनकाडी यांच्या पायऱ्या ओलांडाव्या लागल्याच नाहीत. डायरेक्ट ॲक्शन! ब्रशाच्या तोंडी रंग भरवला आणि क्षणार्धात दोन चार सुरवातीचे वार पुढच्या पेपरवर करीत प्रश्नार्थक नजरेने प्रेक्षकांकडे त्यानी पाहिले. आम्हाला प्रश्न पडला, या दोन-चार रेघोट्यातून सबनीस काय साधणार? पण ब्रश सबनीसांच्या हातात होता. रानटी पशूंकडून चाबकांच्या फटकाऱ्यासरशी हवी ती कामं करून घेणाऱ्या रिंगमास्तरप्रमाणे सबनीसानी ब्रश चाळवला. गरुडाच्या चोचीसारखे नाक आकार घेऊ लागले. मला वाटलं सबनीसांचा रोख महिषासुरमर्दिनी इंदिराजींकडे असावा. अंदाज बरोबर ठरला. **सबनीसानी अगदी कमीत कमी ब्रशचा वापर करून इंदिराजींना प्रेक्षकांसमोर साकार केलं.** प्रेक्षकांनी चांगलाच प्रतिसाद दिला.

सबनीस नुसतेच व्यंगचित्रकार नाहीत हं. व्यंगाप्रमाणे आजूबाजूच्या जगातले मनात टिपून ठेवता येणारे प्रसंग ते चिमणीच्या चोचीने वेचतात. एकच उदाहरण देतो. त्यानी मोठ्या चतुराईने प्रेक्षकांपुढे सवाल टाकला "**व्यंगचित्र काढण्यासाठी सर्वात योग्य आणि सर्वात अयोग्य व्यक्ती कोण?** नरसिंहरावसारखी योग्य व्यक्ती कोण असणार? मी स्वतःलाच प्रश्न केला. पण अयोग्य व्यक्ती कोणं? असेल एखादी शूर्पणखा. आपण असल्या व्यक्ती थोड्या लक्षात ठेवतो! सबनीस दोन क्षण थांबले आणि जॅक पॉट खोलला. **सर्वात योग्य व्यक्ती सीताराम केसरी!** शक्य आहे. ब्रह्मदेव घोरत असताना त्याच्या हातून केसरी घडलेले असावे. पण **अयोग्य व्यक्ती कोण? माधुरी दीक्षित.** बाप रे! माधुरीला अयोग्य म्हणण्याचं धाडस सबनीसच करू जाणेत. सबनीसानी पुन्हा क्षणभर पॉज घेतला आणि मिस्किलपणे हसत म्हणाले, कां माहीत आहे? अहो, माधुरीच्या चेहऱ्यात, व्यक्तिमत्वात, व्यंग शोधूनसुध्दा मिळत नाही. मग कसं काढणार तिचं व्यंगचित्र? सांगा".

प्रेक्षकांना हायसं वाटलं, शेवटी या टवाळी करण्याऱ्या व्यंग-चित्रकाराना 'सवाई कलाकार' भेटला म्हणायचा!

सबनीसानी एक दुधी भोपळयाची आऊटलाईन पेपरवर रेखाटली आणि ब्रशाने नाजुक फटकारे मारीत **भोपळयातून चक्क सीताराम केसरी लोंबता चेहरा करीत डोकावू लागले.** तसाच बारामतीचा दुधीभोपळाहि सजीव केला - शरद पवारांच्या रूपात! प्रेक्षकांनी टाळयांचा कडकडाट करीत आपली संमती प्रगट केली.

भाऊनी कलाकारांचे मनःपूर्वक आभार मानले. सन्माननीय पाहुण्यांचा, सबनीसांचा पुष्पगुच्छ अर्पण करून सन्मान केला.

गुजराथमधील भीषण भूकंपात बळी पडलेल्या मृत व्यक्तींना उपस्थितांतर्फे आदरांजली वाहण्यात आली.

सामुदायिक राष्ट्रगीताने कार्यक्रम संपला. घरी जाता जाता उपस्थितांनी अल्पोपहाराचा समाचार घेतला. ★★★



**कुलबांधवांची आपापसात अनौपचारिक चर्चा**

**जनता जनार्दन कृपा प्रसाद**

माझे नाव जनार्दन. पत्नीचे नाव ठेवले जनता - आम्ही जनताजनार्दन झालो. मेहुण्याने विचारले, मुलांची नावे काय ठेवणार?

मुलगी झाली तर कृपा! मुलगा झाला तर प्रसाद!! दोघेही झाल्यास कृपा-प्रसाद!!!

- **जनार्दन गोविंद** (पृ. ४०५), आगाशी, **'जेथे जातो तेथे...'** या आत्मकथनातून

Marathi Pratishthan

# सांस्कृतिक कार्यक्रम ११-२-२००१ : क्षणचित्रे



तल्लीन प्रेक्षकवर्ग : (डावीकडून) रमेश रामचंद्र, माधव नारायण, सौ. नीलांबरी रमेश, डॉ. सुरेंद्रनाथ, सी. गो. खांबेटे, व सदानंद विष्णु.



तल्लीन प्रेक्षक (डावीकडून) यशवंत सुरेश (YS), विकास सबनीस, सौ. सबनीस, सुलभाताई, सौ. YS


YS व सौ. YS पुणे शाखेच्या कार्याबाबत सौ. नीलांबरी मराठे (पाठमोऱ्या) यांचेशी चर्चा करताना





ढोलकीवादक राकेश चक्रदेव आणि नाणीसंग्राहक मोहन सदाशिव

विकास सबनीस, शरद पवारांच्या व्यंगचित्रासह



Marathi Pratishthan

# पुण्यातील २२वा वर्धापनदिन सोहळा (२६.१.२००१)

**- श्री. माधव वासुदेव** (पृ. ३८६) व **सौ. नीलांबरी रमेश** (पृ. २८०), पुणे

मराठे प्रतिष्ठानच्या पुणे शाखेतर्फे २२वा वर्धापनदिन सोहळा २६ जानेवारी २००१ रोजी सायंकाळी वेदशास्त्रोत्तेजक सभागृह येथे उत्साहाने साजरा करण्यात आला. सभागृहाच्या प्रवेशद्वाराबाहेर **सौ. सुवर्णा मराठे** यांनी सुंदर रांगोळी रेखाटली होती. प्रारंभी **सौ. प्राची मराठे** यांनी तंबोऱ्याच्या साथीने सुमधुर आवाजात गणेश स्तवन गाऊन कार्यक्रमाचा शुभारंभ केला. नंतर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविलेले **श्री. वा. आ. उर्फ अण्णा मराठे** यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले.

वर्धापनदिनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्यांनी सहकार्य केले होते. त्यांचा श्रीफल व पुष्पगुच्छ देऊन मा. अण्णांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यात मुख्यत्वे पत्रे लिहिण्यास मदत करणारे श्री. मुकुंद मराठे, श्री. अच्युत चक्रदेव व श्री. नंदू उर्फ मीननाथ मराठे यांचा व व्यावसायिक अनुभव कथन करणाऱ्या व उतर सर्व वक्त्यांचा समावेश होता.

सत्कार समारंभानंतर या वर्धापनदिनाच्या मुख्य कार्यक्रमाला सुरवात झाली. मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून प्रतिष्ठानचे अध्यक्ष असलेले सुरेशभाऊ मराठे यांचे ५-२-२००० रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. सुरेशभाऊ हे मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ होते. ते नेहमीच प्रतिष्ठानला सर्वतोपरी मदत करीत असत. त्यांनी प्रतिष्ठानचा वृक्ष वाढवताना तन, मन, धन अर्पून अनेक उपक्रम राबवले.

तरुणांनी नोकरीच्या मृगजळामागे न धावता उद्योग व्यवसायात पदार्पण करावे, व्यवसायनिष्ठ बनावे अशी त्यांची मनापासून इच्छा होती. त्यादृष्टीने ते तळमळीने प्रयत्न करीत होते. वेळोवेळी मार्गदर्शन करीत होते. त्याच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त या कार्यक्रमाचा भर उद्योजक-व्यावसायिक यांच्या अनुभव कथनावर होता. त्यांच्या भाषणातून, अनुभवातून उद्योग व्यवसायात पदार्पण करणाऱ्या, स्थिरावू पाहणाऱ्यांना प्रेरणा व मार्गदर्शन मिळावे असा यामागचा हेतु होता.

सर्वप्रथम **श्री. गजानन चिंतामण मराठे** यांनी व्यावसायिकांना आयकरासंदर्भात मार्गदर्शन केले. छोटे व्यावसायिक कोणाला म्हणायचे, आयकर कोणाला लागू होतो, आयकराचे फॉर्म कसे भरायचे, यासारखी बरीच उपयुक्त माहिती त्यांनी दिली. आयकरातून कोणाला व कशा सवलती मिळतात. आपल्या उत्पन्नाच्या १०% पेक्षा जास्त देणगी देणे कसे धोकादायक व अयोग्य आहे हे सोदाहरण सांगून अतिशय मौलिक सूचना केल्या.

प्रतिष्ठानमधील अनेक कुलबांधव काळाची गरज ओळखून सध्या स्वतंत्र व्यवसाय करीत आहेत. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, महत्त्वाकांक्षा, कष्ट करण्याची तयारी, प्रामाणिकपणा, योग्य नियोजन आणि स्वतःचे परीक्षण करण्याची वृत्ती असे विविध गुण त्यांनी अंगिकारलेले असतात. म्हणूनच ते यशस्वी होतात. अशा यशस्वी व्यावसायिकांच्या अनुभव कथनाचा कार्यक्रम स्फूर्तिदायक ठरला.

त्यात प्रारंभी **मराठे मेरीट क्लासचे संचालक श्री. प्रकाश मराठे** यांनी सांगितले की या व्यवसायात यशस्वी होण्यासाठी पेशन्स असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी घ्यावी लागणारी काळजी व पाळावयाची पथ्ये यासंबंधी त्यांनी स्वानुभवातून सोदाहरण माहिती सांगितली. ८वी ते १२वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते विद्यार्थ्यांच्या I.Q. पेक्षा E.Q. (Emotional Quotient) ला जास्त महत्त्व देतात. आजच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांचा स्पर्धात्मक युगात टिकाव लागावा म्हणून ज्ञानदानाबरोबरच ते संस्कार, प्रोत्साहन आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रयत्न करतात.

त्याचवेळेला **श्री. ना. बा. मराठे** यांनी उच्च शिक्षणासाठी योग्य ते मार्गदर्शन विनामूल्य करण्याचा मानस बोलून दाखवला. संपर्कासाठी त्यांचा फोन नंबर पुढीलप्रमाणे ५६५ ६९ ३२.

**श्री. श्रीकृष्ण सिद्धेश्वर मराठे** यांनी २५ वर्षे टेल्कोत नोकरी केली व आता स्वेच्छानिवृत्ती घेऊन अंतर्गत सजावटीचा डेकोरेलचा व्यवसाय सुरू केला आहे. मालाची गुणवत्ता कायम राखून सांगितल्या वेळी काम देण्याच्या संदर्भात ते वचनबद्ध आहेत.

प्रिंटींगचा व्यवसाय करणारे **श्री. प्रमोद विष्णू मराठे** यांनी मार्केटिंगवर लक्ष केंद्रित करणे व वेळ पाळणे हे आपल्या यशाचे गमक असल्याचे आवर्जून सांगितले. मराठे प्रतिष्ठानच्या पुण्यातील कार्यक्रमाची जी आमंत्रणे पाठवावी लागतात ती यापुढे ते मोफत छापून देणार आहेत असे त्यांनी जाहीरपणे सांगितले.

पिंपरीला कारखाना असलेले एक यशस्वी उद्योजक **श्री. अरविंद वासुदेव मराठे** यांनी यमाची एक छोटीशी गोष्ट सांगून सध्या औद्योगिक क्षेत्रातील मंदी लक्षात घेता नव्याने उद्योग चालू करणे अवघड आहे अशी सावधगिरीची सूचनाही दिली. आत्ताच्या तरुण पिढीने जर वडिलोपार्जित व्यवसाय असेल तर त्यामध्ये वाढ करता आली नाही तरी तो आहे त्या स्थितीत चालू राहील, बंद पडणार नाही या दृष्टीने काळजी घेणे आवश्यक आहे हे गरवारे, किर्लोस्कर, वैद्य यांच्यासारखी उदाहरणे देऊन पटवून दिले.

**विंग कमांडर श्री. य. ल. मराठे** हे कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नव्हते. परंतु त्यांनी आपले विचार लिहून पाठवले होते ते सौ. नीलांबरी मराठे यांनी वाचून दाखवले. त्यांच्या मते व्यवसाय म्हणजे उतार शोधून त्या मार्गाने गाडी न्यायची म्हणजे इच्छीत स्थळी चटकन पोहोचता येते. वयाच्या ५२व्या वर्षी निवृत्त झाल्यानंतर टी.व्ही. व फ्रीज विक्रीचे 'विद्युत कार्पोरेशन' या नावाने दुकान सुरू केले. ते म्हणतात कि मी कधीच गिऱ्हाईकाला प्रलोभन दाखवले नाही पण आलेल्या गिऱ्हाईकाला देव मानून सन्मानाची व सच्चेपणाची वागणूक दिली. त्यामुळे एकाने दोघांना माझ्या दुकानाची वाट दाखवली. व्यावसायिकांसाठी आणखी एक मोलाचा



Marathe Pratishthan

सल्ला त्यांनी दिला तो म्हणजे धंद्यात जम बसेपर्यंत त्यातून कमीत कमी पैसा काढावा व आहे त्यात समाधान मानावं पण महत्त्वाकांक्षा ठेवून त्याच्या स्वप्नपूर्तीकरता अखंडपणे धडपड चालू ठेवावी व सतत काहीतरी शिकत रहावं.

राष्ट्रपतींच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरीबद्दल ४ वेळा सत्कार झालेले **विमान दलातील श्रेष्ठ अधिकारी श्री. मधुकर कृष्ण मराठे** म्हणाले की परदेशी आयात मालाला पर्यायी स्वदेशी माल बनविण्यास आपल्याकडे भरपूर वाव आहे. स्वदेशी माल चांगल्या प्रतीचा व गुणवत्तेचा असेल तर मागणीही वाढू शकेल व आपल्या जनतेला त्याचा चांगला उपयोगही होऊ शकेल. विमानात नवे तंत्र वापरण्यासाठी कोणत्या साधनांची आवश्यकता आहे याविषयी तांत्रिक सल्लागार म्हणून ते सध्या काम करतात. त्यामुळे नवीन उद्योग सुरू करणाऱ्यांना ते मार्गदर्शन करण्यासाठी तयार आहेत.

**श्री. शरद खांबेटे** यांनी सांगितले की व्यवसायात यशस्वी होण्यासाठी जिद्द आणि शिस्त या गोष्टींची आवश्यकता आहे.

यानंतर **लष्करातील संधी या विषयावर श्री. प्रमोदन मराठे** यांनी अतिशय मौलिक व उपयुक्त माहिती दिली. खरं तर NDA महाराष्ट्रात आहे पण NDA मधे एकही महाराष्ट्रीयन तरुण नाही ही सत्यस्थिती आहे. प्रमोदनना असे वाटते की लष्करात यशस्वी होण्यासाठी १५% ज्ञान लागते व ८५% आत्मविश्वास, निरोगी शरीर, निर्णयक्षमता, व्यक्तिगत नियोजन, स्वयंशिस्त, वेळेचे महत्त्व यासारख्या अनेक गोष्टी आवश्यक असतात. हे सर्व असेल तर मुलगा २१व्या वर्षीच मान, १२ हजार पगार व इतर कितीतरी संधी उपभोगू शकतो. जास्तीत जास्त संख्येने तरुणांनी लष्करात येण्यासाठी पालकांनी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. लष्करातील शिस्त व्यक्तिगत व सामाजिक जीवनात पदोपदी उपयोगी पडू शकते. लष्करी सेवेतील फायदे व सवलती यांचीही त्यांनी माहिती दिली. ही सर्व माहिती त्यांनी पारदर्शिकांच्या सहाय्याने दिली. लोकांना ही माहिती खूपच उपयुक्त वाटली व आवडली.

श्री. प्रमोदन मराठे कारगिलवरही पारदर्शिकांच्या सहाय्याने माहिती देण्यास तयार आहेत हे ऐकून सर्वच कुलबांधव या अपूर्व संधीचा फायदा घेण्यास उत्सुक आहेत हे जाणवले. त्यामुळे लवकरच **मराठे प्रतिष्ठान** पुणे शाखेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करू असे सौ. नीलांबरी मराठे यांनी आश्वासन दिले. आता त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालू आहेत. (कर्नल प्रमोदन प्रभाकर यांचा "करियर ऑपॉर्च्युनिटीज इन दि आर्म्ड् फोर्सेस" हा लेख याच अंकात पुढे दिला आहे. - संपादक)

यानंतर **श्री. वि. रा. तथा अरविंद मराठे** यांनी गुजराथ मधे भयंकर भूकंप होऊन त्यात शेकडो माणसे मृत्युमुखी पडल्याचे वृत्त सांगितले त्यामुळे सर्व उपस्थितांनी २ मिनिटे उभे राहून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

शेवटी पाहिजे तेवढा गरमा गरम उपमा, जिलबी व चहा या उपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे **सूत्रसंचालन व निवेदन सौ. नीलांबरी मराठे** यांनी उत्कृष्टपणे केले होते.

**२६ जानेवारीच्या कार्यक्रमासाठी** पुण्यातील पुढील कुलबांधवांनी **देणग्या** दिल्या आहेत. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद! मनापासून आभार!

| | |
|---|---|
| १) विंग कमांडर श्री. यशवंत लक्ष्मण मराठे | ५००.०० |
| २) श्री. नरेंद्र बाळकृष्ण मराठे | १०००.०० |
| ३) श्री. यशवंत गजानन | १००.०० |
| ४) श्री. वासुदेव दत्तात्रय | १०१.०० |
| ५) श्री. अनिल लक्ष्मण | १००.०० |
| ६) श्री. बाळकृष्ण काशिनाथ चक्रदेव, | ५१.०० |
| ७) श्री. गजानन चिंतामण | ३०.०० |
| ८) श्री. शशिकांत गोविंद | १००.०० |
| ९) श्री. वसंत कृष्णाजी | १००.०० |
| १०) श्री. पुष्कराज वामन, मुंबई | १५१.०० |
| ११) श्री. वि. रा. मराठे | ५१.०० |
| १२) श्री. मधुकर कृष्ण मराठे | ५००.०० |
| १३) श्रीमती शालिनीबाई जगन्नाथ | ५००.०० |
| एकूण जमा | ३२८४.०० |

या कार्यक्रमास पुढीलप्रमाणे **काही बाहेरगावची मंडळी** केवळ हितगुजमधील जाहीर निमंत्रण वाचून उपस्थित राहिली त्याबद्दल पुणे शाखेतर्फे त्यांना धन्यवाद!

१) आपल्या तरुण नातवाला घेऊन नाशिकहून आलेले ८४ वर्षांचे स्वातंत्र्यसैनिक श्री. सीताराम वासुदेव.
२) नातू श्री. सचिन किरण - नाशिक.
३) श्री. व सौ. सुहास श्रीपाद - किर्लोस्करवाडी, जि. सांगली.
४) श्री. यशवंत मयूर - विश्रामबाग, सांगली.
५) श्री. वामन ग. मराठे - मुंबई.
६) श्री. पुष्कराज वामन मराठे - मुंबई.
७) श्री. व सौ. मनोहर चक्रदेव - मुंबई.

★★★

## खुषीपत्र

हितगुज वाचनीय असते. 'मराठे' मंडळींना हितगुज हा आपला आनंददायी जिव्हाळ्याचा नातलगच वाटत असणार!

हे पत्र लिहिण्याचे खास कारण - आपण अनंतराव मराठे यांना लिहावयास प्रवृत्त केले याबद्दल! ते पत्रकार होते. त्यांच्याजवळ लिहिण्यासारखे खूप आहे. त्यांचा हातहि लिहिणाऱ्याचा आहे. मी त्यांच्या तोंडून नेहमी मनोरंजक माहितीपूर्ण किस्से ऐकत असतो. मी 'लिहा' म्हणून आग्रहहि करतो. आपण यशस्वी झालात. डिसेंबर २००० मधील 'किस्सा लाल फितीचा' मधील मा. का. देशपांडे यांचे इंग्रजीचे वर्ग होते. आचार्य अत्रे यांनी त्यांचे वाभाडे काढणारा 'तेरी मा. का.' असा लेख नवयुगमधे लिहिला होता.

अनंतराव मराठे यांनी लिहावे. अशी त्यांना जाहीर विनंती.

- **भा. ल. महाबळ**, मुलुंड, मुंबई.

***(अशी अनेकांनी इच्छा व्यक्त केली आहे. अ. स. इच्छा त्यांची पुरी करतील अशी आशा करतो. - संपादक)***



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

### दानशूर शिक्षणप्रेमी रमेश बाळकृष्ण



राजापूर तालुक्यातील डोंगर गावातले कुलबांधव रमेश बाळकृष्ण (पृ. २९२) यांनी वडिलार्जित मालकीची ३५ एकर जमीन राजापूर येथील आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेजला देणगी म्हणून दिली. तसेच रयत शिक्षण संस्थेतर्फे चालवल्या जाणाऱ्या या कॉलेजला आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याबाबतहि त्यांनी पुढाकार घेतला. १९९४ मध्ये स्थापन झालेल्या या कॉलेज संकुलाचे उद्‌घाटन ६-११-२००० रोजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी **मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री. रमेश मराठे यांचा सपत्निक सत्कार** करण्यांत आला. त्यांच्या या देणगीबद्दल कृतज्ञता म्हणून रयत शिक्षण संस्थेने या कॉलेजचे 'आबासाहेब मराठे आर्ट्स् अॅन्ड न्यू कॉमर्स, सायन्स कॉलेज राजापूर' असे नामकरण केले.

### क्रिकेटपटु सुशांत



प्रतिष्ठानचे विलेपार्ले, मुंबई येथील सभासद **हेमंत महादेव यांचा मुलगा सुशांत** (पृ. ४७१) याने इ.स. २००० साठीची क्रिकेटमधील संदीप पाटील शिष्यवृत्ती मिळवली. त्याचे क्रिकेटमधील पराक्रम पुढीलप्रमाणे -

१) एप्रिल २००० मध्ये झालेल्या 'सामना करंडक' या १४ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय स्पर्धेत मुंबई संघाकडून खेळला व या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट यष्टिरक्षणाचे पारितोषिक त्याला मिळाले.

२) २००० साली पश्चिम विभागीय संघासाठीच्या अहमदाबादमध्ये झालेल्या बाळ महाडळकर करंडक स्पर्धेत मुंबई संघाकडून खेळला. विजयी मुंबई संघाकडून खेळताना स्पर्धेतील सर्वाधिक धावा त्याने काढल्या.

३) कल्पेश कोळी चषक १६ वर्षांखालील मुलांसाठीच्या स्पर्धेत प्रथमच खेळतांना वैयक्तिक २२२ धावा काढून पहिल्या विकेटसाठी ४५९ धावांची विक्रमी भागीदारी केली.

४) Mumbai Cricket Association कडून २००० सालासाठी सर्वोत्कृष्ट युवा खेळाडू (१४ वर्षांखालील) म्हणून निवड झाली.

### जनार्दन गोविंद यांचे प्रांजळ आत्मकथन ''जेथे जातो तेथे...''



**निवृत्त गुदाम अधीक्षक मुंबई बंदर, जनार्दन गोविंद** (पृ. ४०५), आगाशी यांचे आत्मकथन 'जेथे जातो तेथे...' प्रसिद्ध झाले आहे. ज. गो. हे बहुरूपी आहेत. ते गुरुजी आहेत, ज्योतिषी आहेत, हस्तसामुद्रिक आहेत, कीर्तनकार आहेत, व्याख्याते आहेत, समाजसुधारक आहेत त्यांचा कवितासंग्रहहि प्रसिद्ध झाला आहे. नवाकाळ, किरात, साहित्यसंगम, गृहलक्ष्मी, ज्योतिर्विवेक इ. नियतकालिकांतहि त्यांनी लेखन केले आहे.

या बहुरूप्याचे अंतरंग जाणून घेण्यासाठी त्यांचे पुस्तक मुळातूनच वाचायला हवे. वानगीदाखल या पुस्तकातले काही उतारे या अंकात चौकटीत छापले आहेत. मराठे **कुलबांधवांना १०० रु.चे हे पुस्तक ५० रु.ला मिळणार आहे. पत्ता :** अे ७/२२३ परांजपेनगर, कोफराड, पोष्ट आगाशी, पिन - ४०१३०१. (फोन - ५८८६९५.)

### नांदा सौख्य भरे

१) मुलुंड, मुंबई येथील सभासद **डॉ. अमित यशवंत याची बहीण अस्मिता** (पृ. २९२) हिचा विवाह केदार वसंत वैशंपायन यांचेशी १६-१२-२००० रोजी संपन्न झाला.

२) खोतोडे, गोवा येथील सभासद **लक्ष्मण पांडुरंग यांची कन्या नीलिमा** (पृ. ५४३) हिचा विवाह सावईवेरे, गोवा येथील संदेश भालचंद्र खेडेकर यांचेशी दि. १८-१२-२००० रोजी संपन्न झाला.

**नवविवाहित वधुवरांस मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा!**

### खुषीपत्र

**- श्री. सुधाकर विष्णु व सौ. साधना सुधाकर** (पृ. ५८) नागांव, जि. रायगड

मी हितगुजसाठी प्रथमच कथा पाठवीत आहे. आपला अंक मला नेहमीच आवडतो. यंदा २६ जानेवारी २००१ला साजऱ्या होणाऱ्या कार्यक्रमासाठी आमच्या उभयतांच्या हार्दिक शुभेच्छा. प्रतिष्ठानसाठी रु. २०१ मनीऑर्डरने पाठवीत आहोत.

(शुभेच्छा व देणगीबद्दल आभार. कथा पुढील अंकात प्रसिद्ध होईल. - **संपादक**)

### सहवेदना

सांगली येथील सभासद **श्रीधर वामन फडणीस** (पृ. २२८) यांचे शनिवार दि. १६-१२-२००० रोजी निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. ईश्वर त्यांच्या आत्म्याला सद्‌गती देवो अशी सर्व मराठे कुलबांधवांतर्फे सदिच्छा! (श्रीधर वामन यांच्या अल्प परिचयासाठी पहा हितगुज अंक १८, जून १९९४) ★★★

Self-Improvement

### Measure of Happiness

✣ Acquisition and possession of wealth is no measure of the quantum of one's happiness. Happiness is measured by the tranquility of one's own mind.

✣ Spread Happiness - Some of it will stick on to you too.

### Way Up & Down

✣ Be nice to the people on your way up; you might have to see them on your way down.

Marathe Pratishthan

# Career Opportunities in the Armed Forces

- Colonel **P. P. Marathe,** Retd. (P. 388), Pune

Selecting a career has become a complex affair. The parents and their wards need to consider four factors before deciding on career options, viz. Aptitude, Capabilities, Return-Growth and opportunities.

Aptitude is the basic inclination of a person combined with intelligence. Two persons with same level of intelligence may have different liking. One may be good in logic and resoning whereas the other may display greater creativity. Same person also displays selective intelligence. This aspect needs to be critically studied by the parents and teachers for every student.

Capabilities are something, which could be developed with efforts, on the basic platform of proven aptitude. Parents need to work out the possible avenues suitable for the child's aptitude and deduce as to what qualities are essential for a particular profession. These qualities need to be developed. An introvert may be less suitable for a career requiring extensive human communications, he may have to be re-moulded and tutored to communicate freely.

Opportunities for many people are drying up with the advent of "Reservations" and cost of education. A donation seat of a medical college may cost anything upwards of 10 lacks as of now. Payment seat costs Rs. 70 thousand a year. Not every body can afford it.

Returns and growth are the only concerns that student and the parents show. After all, what returns are expected by every one? Is that the only binding aspect? Is it that Satisfaction, Job Security, Respect and Healthy Work Culture have no place of consideration? We need to realign our materialistic approach.

It is worth considering career options in the Armed Forces. This probably is the last thing on the minds of youngsters and their parents. Why? There are plenty of myths and misunderstandings in the minds of our sociey, concerning the armed forces. These myths keep the youth with good intelligence and well-developed capabilities away from the armed forces. It is worth considering the myths and the realities one by one.

❖ **Myth:** The armed forces are meant for those who are good in studies or less intelligent.

**Reality :** The armed forces may not require academicians, but do require people who are sharp, intelligent and speedy decision makers. He/she handles complex issues under trying circumstances.

❖ **Myth:** Armed forces require very muscular and strong physic.

**Reality:** Armed forces require physically fit people. They may be of average built, but should be active, agile and robust. There is no place for people who are prone to disease. Remember - muscular does not always mean, "fit".

❖ **Myth:** Armed Forces have only physical oriented activities, which are tiring. **Reality:** Today' armed forces fight more on the basis of technology and advanced leadership and management techniques. Strategic and tactical handling is of greater importance and hence armed forces have more activities oriented towards tactics and strategy and administrative aspects.

❖ **Myth:** Armed forces have high-risk environment. **Reality:** The civil population in India is perpetually facing risks like disasters, road accidents and high-risk environment of diseases. Also, the future wars are not likely to be restricted to the border areas; they are likely to be fought on the concept of "Deep Battle" and the important townships will be more prone to disastrous attacks.

❖ **Myth:** The people in the armed forces get involved in (bad) drinking and smoking habits. **Reality:** This habit is on the

**उद्योग प्रेरणा**

मी के. आर. डामरे, मुंबई महानगर पालिकेमध्ये काम करत असून, माझे मित्र श्री. विनायक मराठे यांचेशी गप्पा मारताना त्यांच्या टेबलावर हितगुज नावाचे मासिक बघितले. अधिक चौकशी करता आपल्या संस्थेची माहिती मिळाली. विशेषतः तुमच्या प्रेरणा ह्या उपक्रमाने प्रेरित होऊन माझ्या धाकट्या भावास मी उद्योग व्यवसायाकडे वळविले. नाशिक येथे त्याने छोट्या प्रमाणावर ऑईल मिल सुरू केली असून त्याचा व्यवसाय ठीक चालला आहे. सध्या भुईमुगाच्या तेलाची मागणी कमी होत असून इतर तेलबियांसंबंधी माझ्या भावास मार्गदर्शन हवे आहे. **आपल्या सभासदांपैकी या क्षेत्रातील जर कुणी तज्ञ व्यक्ती असली तर कृपया मला जरूर कळवावे ही विनंती. - के. आर. डामरे** मे. श्रद्धा ऑईल इंडस्ट्रीज, पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक. (फोन - ५६५ ५३ ४६ मुंबई)

Marathe Pratishthan

decrease in the armed forces and is on the increase beyond control in the corporate sector as well as amongst youth studying in colleges.

❖ **Myth:** Post retirement job opportunities are lesser. **Reality:** Officers of the armed forces are most suitable to hold responsible jobs as CEOs of any organisation because of the development that they go through. They learn discipline, organising, planning, analysing, decision-makeing and execution skills. They are true leaders and managers. This invariably lands them into good jobs, after they retire.

❖ **Myth:** Pay and Perks in the armed forces are not very attractive. **Reality:** The fifth pay commission has corrected anomalies regarding pay and perks. A young officer gets a stipend of Rs. 8000/- p.m. during the training period in the last one year of his/her training. On commissioning, an officer draws approx Rs. 10,000/- p.m. apart from many other attractive allowances. Apart from this, an officer is authorised free rations, free medical treatment (unlimited extent), LTC by AC class on the railway, free subsidised accommodation, free transport and communications, all sports facilities almost free of cost, adventure training, healthy living conditions (pollution free) and tremendously healthy and nurturing work culture. Armed forces allow 2 months of annual leave and 20 days of casual leave every year apart from the facility of 2 years full-pay study leave to pursue higher studies. All this is far too attractive and can only be better than the best in the corporate world.

If all this is taken into consideration, armed forces offer a viable option for the young generation. What is required is the right guidance and motivation from the parents.

**Different Modes of Entry :- After 12th**

❖ **National Defence Academy-** 3 years course at NDA followed by one year at the respective academies of the three services (army, navy, air force). Entry is after passing the NDA entrance examination twice a year, Apr-May and Sep-Oct conducted by the UPSC followed by the Services Selection Board (SSB) Interview conducted by the services. Age limit is 16.5 to 19 years at the time of joining the academy. Students interested in joining should apply immediately after finishing their 11th standard exams. Entire training is free of cost.

❖ **Engineering Entry:** Students passing 12th standard with at least 70% marks in PCM have to apply. The advertisement appears twice a year, around May and Oct. There is

## निसर्गाचे शक्तिप्रदर्शन

हे निसर्गा,
आज ... पुन्हा एकदा
आम्हाला शरण यायला भाग पाडलंस
बुध्दीच्या जोरावर,
पृथ्वीच पादाक्रांत करायला निघालेले आम्ही,
आकाशाला गवसणी घालतानाच,
अवकाशाचाही वेध घेण्यासाठी,
आमची नजर लागलेली क्षितिजावर!
स्वप्नं सत्यात उतरण्यासाठी,
पायही भक्कम रोवावे लागतात जमिनीवर,
याचं भान नव्हतं आम्हाला,
आणि पाऊल स्थिर राहणं आपल्या हाती नाही,
हे कळलंच नाही,
आमच्या चौखुर उधळलेल्या बुध्दीला!
तुझ्या अंतःकरणातली खळबळ
कधी पोचलीच नाही आमच्यापर्यंत.....

पण काल -
कालचा दिवस तुझा होता
तुझ्या शक्तिप्रदर्शनाचा!
आम्ही बुध्दिवंत म्हणून कितीही गमजा केल्या,
तरी शेवटी सगळ्याचा रिमोट कंट्रोल तुझ्याच हातात,
हे जाणवून देण्यासाठी,
इतक्या निरपराधांचा नैवेद्य लागला कां तुला?
की आम्ही बुध्दीच्या कैफांत,
तुझ्या रचनेत ढवळाढवळ केली
त्याची ही शिक्षा....?
इच्छा असो नसो,
तुझं श्रेष्ठत्व मान्य करायलाच हवं

पण काय रे -
ही सृष्टी निर्माण करताना
तुझंच तर पारडं झुकलं ना मनुष्याकडे ?
इतरांपेक्षा अंमळ जास्तच
बुध्दीचं दान दिलंस आम्हाला.
तेव्हा लागली नाही तुला,
भविष्यातल्या संकटाची चाहूल?
हे अपत्य,
एक दिवस डोईजड होईल
हे खरंच कळलं नाही तुला?
मग.......
आजच्या या विदारक परिस्थितीचं
उत्तरदायित्व ही तुझंच....

शेवटी एकच सवाल,
'ईश्वर मृतात्म्यांना शांती देवो',
असं कोणाला विनवू आम्ही?
कुठाय तो ईश्वर.....
अरे, तो तर तुझंच मूर्तरूप....
म्हणजे, ......
संहारकाकडेच करायची का याचना
आत्म्याला शांती देण्याची?

- **कविता मयेकर** (अरविंद दामोदर, पृ. २९२, डोंबिवली यांची कन्या)



Marathe Pratishthan

no entrance exam for this. The candidates are called upon to face the Services Selection Board interview and merit list is prepared. The successful candidates are given engineering training of 4 years and military training of 6 months. This training is free of cost and entire expenditure on lodging and boarding is borne by Govt of India. This entry is available only in the Army and the Navy. A degree from recognised affiliated university (like Pune) is grnated at the end of the 4.5 year of training. Age limit is 16.5 to 19 years at the time of joining.

❖ **Medical:** Through Armed Forces Medical College. An entrance exam is conducted every year in May. Advertisement appears any time after January. Successful candidates (as per merit) are called for the interview and a merit list is prepared.

❖ **After Graduation:**

❖ **Through Combined Defence Services Entrance:** (CDSE) Exams conducted twice a year. Age limit is 19 to 24 years for permanent commission and 25 years for short service commission. The entrance exams are conducted by the YPSC and successful candidates are called to take Services Selection Board interview. Merit is prepaerd. The training is for 1.5 years at the respective academies for permanent comission and 9 months for the short service commissions. The entire training and lodging/boarding is free.

❖ **University Entry for Engineers :** Engineering students in final and pre-final year are screended for suitability and the short-listed candidates are called for the SSB Interview.

❖ **NCC Entry :** Students who pass NCC 'C' certificate are accepted without entrance exam. They face only the SSB interview. Applications for this are preferred once a year.

❖ **Technical Entry Scheme:** Engineering graduates can apply for this entry. Only SSB interview is required to be attended.

(**Note:** for engineers, the upper age limit is 27 years for most entries and 28 years for some)

❖ **Women's Entry Scheme:** Women are allowed in the armed forces after graduation. Generally a first class at graduation and high second class at post-graduation level is preferred. They also have to attend the SSB interview.

❖ Apart from this, various technical personnel are required for Ground Duties, Logistics, Education field, Law etc in the services. The advertisements for these appear in the papers (especially employment exchange.)

**Conclusion:** Armed forces offer a vast field and great challenges to the young generation. The services require people from all walks of life - computers, technocrats, executive cadres, logistics. Warfare has matured in the 20th century and offers even more dynamic challenges in the current century. It is for the younger generation to make the most of it. For that, one needs to take a more rational view of own Strengths and Weaknesses, muster up the thoughts about own Dreams, Ambitions and match them against own aptitudes, attitudes and opportunities. ★★★

**संवाद** - कुलसंमेलनाची तयारी कुठवर आली? रत्नागिरी संमेलनाचा 'निमंत्रक' म्हणून हाती घेतलेली 'वीणा' मी आगामी संमेलन निमंत्रकाकडे सूपूर्द करण्यास उत्सुक आहे.

- **भास्कर नरहर** (पृ. ४६), रत्नागिरी.

*(तुमच्याप्रमाणे अनेकजण आगामी संमेलनाकडे डोळे लावून आहेत. आम्हीहि निमंत्रकांची वाट पहात आहो. - संपादक)*


# TRISHAKTI

PERSONALITY DEVELOPMENT GROUP

**Our Courses:**

❖ **Combined Defence Services Entrance Exam.**

❖ **National Defence Academy Entrance Exam.**

❖ **PSI Entrance Exams (Preliminary and Mains).**

❖ **Services Selection Board Interviews.**

❖ **Interviews and Group Discussions for all Corporate and other Entrance Exams.**

❖ **Personality Development to include : Study Methods, behavioural problems and Improving Concentration, Memory and Time Management.**

*Address :-*

*Trishakti (PDG), 1209/B, K. P. Kulkarni Marg, Off Apte Road, Deccan, Pune - 4. Tel. : 5532830/4224789*





Marathe Pratishthan

# अवसान

## आकाशवाणीच्या सांगली केंद्रावरून प्रसारित झालेली कथा

- **विठ्ठल महादेव** (पृ. २३५), विश्रामबाग, सांगली. (फोन : ३०० ०७२)

शहराच्या बाहेरील विस्तारित वस्तीतील गणेशनगरच्या चौथ्या गल्लीतील चौकात आज नुसती धामधूम सुरू होती. आज गणेश नगरातील एक नागरिक मामा पाठक यांचा सत्कार होणार होता. गेल्या महिन्यात मामानी एका चोरास पकडण्याचे धैर्य दाखविले होते. या चोराला पकडल्यामुळे परिसरातील बऱ्याच चोऱ्यांमागील टोळी पोलीसांना सापडली. मामानी दाखविलेल्या असामान्य धैर्याबद्दल त्यांचा सत्कार करून इतरांना आदर्श घालून देण्याचे गणेश नगर संरक्षण समितीने ठरविले होते.

गेल्या चारपांच वर्षात शहराची बरीच वाढ झाली होती. त्यापैकीच गणेश नगर ही वसाहत. सुमारे शंभर प्लॉट पडलेल्या या वसाहतीत अर्ध्याहून अधिक घरे बांधली होती. इतर काही प्लॉटचे मालक निवृत्तीनंतर घरे बांधणार होते. मोकळ्या प्लॉटसमधे गवत व झाडेझुडपे भरपूर वाढली होती. संध्याकाळी सात वाजल्यानंतर कॉलनीमधे रस्त्यावर शुकशुकाट व्हायचा. गेली दोन वर्षे गणेश नगरातील नागरिकांनी चोऱ्यामाऱ्यांचा भरपूर अनुभव घेतला होता. प्रत्येकजण 'यावर काहीतरी उपाय केला पाहिजे' असे बोलत होता. पण पुढे होऊन कोणी काही करीत नव्हता.

लिमये वकिलांचा बंगला नुकताच पूर्ण झाला होता. ते आता गावातून कॉलनीमधे रहाण्यास आले होते. मुळातच समाजकार्याची आवड असणाऱ्या लिमयांना 'कोणीतरी पुढे होऊन मार्ग काढला तर सर्वजण तयार होतील, समाजात उणीव आहे ती नेतेपणाची' याची जाणीव होती. म्हणून त्यांनी आपल्या बंगल्याच्या वास्तुशांतीनिमित्त वसाहतीतील सर्वांची आपल्या बंगल्यावर मीटिंग बोलाविली. "आपण सर्वांनी मनांवर घेतले तर कॉलनीमधे एकही चोरी होणार नाही. एखादा चोर सापडू दे, आपण त्याला खडी फोडायला पाठवू." असे मीटिंगमधे सांगून 'गणेश नगर संरक्षण मंडळा'ची स्थापना केली. वकीलसाहेबांच्याकडे वास्तुशांतीचे जेवण झाले असल्यामुळे व नवीन मंडळाची काही वर्गणी, प्रवेश फी इत्यादि नसल्यामुळे सर्वांनी त्यांच्या या प्रस्तावाला मान्यता दिली.

या मंडळाच्या मुख्य उद्देशांत वसाहतीमधे रात्री गस्त घालून वसाहतीची राखण करायची. घरातील प्रत्येक पुरुष व्यक्तीने आठवड्यातून एकदा तरी गस्ती तुकडीत सामील व्हायचे, रात्री अकरा ते पहाटे पाच पर्यंत गस्त घालायची, गस्ती तुकडीने एकमेकास आरोळ्या देऊन कॉलनीमधे जाग ठेवायची आणि कोठे काही विशेष वाटले तर शिट्ट्या फूंकून धोक्याचा इशारा द्यायचा असे ठरले. ठरल्याप्रमाणे पहिल्या दिवसी आठ तुकडया तयार झाल्या व या गस्ती योजनेचे रीतसर उद्घाटन झाले.

सर्व चांगल्या योजनांचा जसा बोऱ्या वाजतो तसाच या गस्ती योजनेचाही दोन चार महिन्यात बोऱ्या वाजला. कोणाला रात्री जागरणाने पित्त होते म्हणून तर कोणाला सकाळी लवकर कामावर जायचे असायचे म्हणून ते रात्री गस्त घालायचे टाळू लागले. काहींना तर ही योजनाच मनापासून पसंत नव्हती. त्यांचे म्हणणे, 'वकीलसाहेबांनी खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे करून बरेच डबोले मिळविले आहे. आता ते सांभाळायची त्यांना काळजी आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या स्वार्थाची ही योजना लोकांच्या गळ्यात मारली. आम्ही आजपर्यंत दिवस काढलेच ना?'

'मला तर माहीतच होते की या योजनेत राम नाही. ती चालणार नाही.' चहाच्या गाडीवर 'टू बाय थ्री'ची ऑर्डर देऊन गप्पा मारण्यात वेळ काढणाऱ्या त्रिकुटातील जोशींनी शेरा लगावला.

तेवढयात एका ठकलगाडीवरून एक फुलसाईज कटआऊट चौकातील समारंभाच्या ठिकाणी चाललेला दिसला.

'बघूया बघूया कसला कटआऊट आहे तो' असे म्हणून जोशींनी तो कटआऊट उभा केला. डोक्याला टक्कल, अंगात पट्ट्यापट्ट्याचा लांब बाह्यांचा शर्ट व पायात पट्ट्यापट्ट्याची लांब विजार असलेल्या बावळट माणसाचा तो कटआऊट बघून सर्वजण चाट पडले.

''जोशीबुवा, अध्यात ना मध्यात सीरियल संपली ना? मग आता त्यातील हा नाडकर्णींचा कटआऊट कशाला मिरवताय?'' कुलकर्णींनी आश्चर्यचकित होऊन विचारले. 'अध्यात ना मध्यात' मधल्या नाजकर्णींची भूमिका, त्यांचा बावळट चेहरा, गबाळा वेष व ऐन मोक्याच्या वेळी माघार घेऊन सारवासारव करीत गुळमुळीत उत्तरे देवून निसटण्याचे त्यांचे कसब यामुळे कुलकर्णींच्या चांगलीच लक्षात राहिली होती. ''कुलकर्णी रावसाहेब, ती सीरियल केव्हाच संपली. तो कटआऊट नाडकर्णींचा नाही, तो आहे चौथ्या गल्लीतल्या मामा पाठकांचा! अगदी हुबेहूब नाडकर्णींची कॉपी आहे! चोर पकडल्याबद्दल आज त्यांचा जिथे सत्कार होणार आहे त्या ठिकाणी हा कटाऊट लावून लोकांना त्यांचे दर्शन घडविणार आहे आपली गणेश नगर संरक्षण समिती!''

हेच होय ते मामा पाठक? चोरांशी झटापट करून चोर पकडला म्हणून ज्यांचा गाजावाजा होत आहे ते हे ! अहो यात काहीतरी गडबड दिसते आहे. हे मामा कसले चोर पकडतायत? हे होते ना दोन दिवस आमच्या गस्ती तुकडीत. हातात काठी धरायला सुद्धा घाबरत होते. सर्वांच्या मागे मागे असायचे. एकदा आम्ही चौकात कोंडाळे करून बसलो होतो. गप्पा मारता मारता भुतांच्या गोष्टी निघाल्या. त्यावेळी यांची जी घाबरगुंडी उडाली ती अजूनही आमच्या लक्षात आहे. त्यांच्या अंगाला घाम सुटला होता. तत-पप करीत ते म्हणाले ''अहो उगाच विषयांतर नको.'' त्यांची घाबरगुंडी बघून व आणखी काही बाका प्रसंग येऊ नये म्हणून आम्ही भुतांच्या गोष्टी आवरत्या घेतल्या व गस्तीच्या दुसऱ्या राऊंडला त्याना घरी पोचवले 'आम्ही आहोत मामा गस्त घालायला. तुम्हाला या वयात कशाला त्रास! तुम्ही नाही आलात तरी चालेल' असे सांगून त्याना गस्ती तुकडीतून निवृत्त केले. तेही पडत्या फळाची आज्ञा समजून यायचे बंद झाले.

''ते काही का असेना. त्यानी चोर पकडला हे खरं दिसतं. उगाच नाही त्यांचा सत्कार होतोय तो! सत्काराला उत्तर देताना चोर कसा पकडला याची हकीगत सांगा असा आपण आग्रह धरू म्हणजे कुणाला संशय रहाणार नाही,'' कुलकर्णींनी विषय तोडला.

गस्ती योजनेचा बोऱ्या वाजल्यावर एक



Marathe Pratishthan

दिवस वकीलसाहेबानी योजना बंद झाल्याची घोषणा केली. यापुढे ज्याचे त्याचे घराचे रक्षण करावे असे जाहीर करून टाकले. सामुदायिक योजना रद्द झाल्याने आता प्रत्येकाने आपल्या घराची राखण करावयाची जबाबदारी घेणे जरूर होते. चौथ्या गल्लीत शेवटी असलेल्या विद्या अपार्टमेंटमधील लोकांनी या [illegible] मुहतोड जबाब देण्याचे ठरविले.

"हे बघा, आता आपल्या अपार्टमेंटमधे चोरी होऊ न देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. बाहेरचे कोणी गस्त घालून आपल्या अपार्टमेंटची राखण करणार नाहीत व आपल्यालाही दुसरीकडे राखण करायला जायला नको. तेव्हा सर्वांनी रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून सावध राहिले पाहिजे. त्यासाठी आपण सर्वांनी अमलात आणायच्या उपाय योजनांबद्दल कुणाला सूचना करावयाच्या असतील तर कराव्या''. अपार्टमेटचे सेक्रेटरी महाबळ यांनी मीटिंगला सुरवात केली.

''हे बघा पहिले तत्व म्हणजे आपण आपले संरक्षण करण्यास शिकले पाहिजे. महिलांनी जागरूक राहिले तर बऱ्याच गोष्टी टळतील. चोर घरात शिरला तर फसकन त्याच्या डोळयात तांबडया तिखटाची पूड फेकली गेली पाहिजे,'' असे म्हणताना जोशीबाईंनी 'फसकन' या शब्दाचा असा काही आवाज काढला ती जवळपास कोठेतरी कॉंप्रेसरचा पाईप एकदम निसटला की काय असाच सर्वाना भास झाला व सर्वजण इकडे तिकडे पाहू लागले.

''दुसरी महत्वाची गोष्ट. कोणत्याही मजल्यावर गडबड ऐकू आली अगर इशारा घंटा ऐकू आली की सर्वांनी पळत मदतीला धावायचे. नाहीतर तावडीत सापडलेला चोर पळून जायचा,'' पाचव्या मजल्यावरील शास्त्रींनी सूचना मांडली.

''आणि जनुभाऊ बघा हं, चटकन पळत वर जाता आलं पाहिजे. जरा टॉनीक वगैरे घेऊन तंदुरुस्त रहा,'' जनुभाऊकडे बघत व 'तंदुरुस्त' शब्दावर जरा जोर देत बापूनी डोळे मिचकावले. निरनिराळ्या सूचनानी मीटिंग आणखी लांबली असती परंतु सेक्रेटरीना आता वेळ नव्हता. त्यांनी सर्वाना 'गुडलक' विश करीत गुडबाय केले व मीटिंग संपल्याचे जाहीर केले.

मीटिंगमधे ठरल्याप्रमाणे प्रत्येकजण आपल्या परीने सावधानतेने रहात होता. रात्री जरा कोठे आवाज ऐकू आला की सर्वजण चटकन जागे होत. सगळीकडचे दिवे पटापट लागत. पण त्यावेळेस कोठेतरी मांजर कडमडलेले असायचे अगर चोरून मारून बाहेर गेलेला कॉलेज कुमार उशीरा घरात येताना आवाज झालेला असायचा.

बऱ्याच दिवसात कोठे चोरी वगैरे झाल्याचे ऐकिवात नव्हते. आणि एक दिवस, ती परीक्षेची रात्र आली!

चौथ्या मजल्यावर राहणारे मामा पाठक म्हणजे एकदम निरुपद्रवी पेन्शनर! कुणाच्या अध्यात ना मध्यात! एखादी खुनाची अगर मारामारीची घटना नुसती ऐकली तरी स्वारी घामाघूम व्हायची! त्यांचे कुटुंब मात्र अतिविशाल महिला मंडळाच्या सभासद होण्याच्या योग्यतेचे अनुरूप पात्र! मामा जरा घाबरले की त्याच त्यांना धीर देत असत.

रात्री मामा देवाचे नांव घेऊन कॉटवर निद्रेच्या स्वाधीन झाले. मामी तेथेच खाली गादी घालून आडव्या झाल्या. दोघे गाढ झोपेत असातानाच 'ए बुढया' म्हणत खोलीत प्रवेश करणाऱ्या काळ्या भिन्न चोराच्या आरोळीने दोघाना जाग आली. क्षणार्धात काय प्रसंग ओढवला आहे याची मामाना कल्पना आली. 'निकालो, तिजोरी की चावी निकालो' असे म्हणत चोरटा मामांच्या कॉटजवळ उभा राहिला. त्याचा एक पाय मामांच्या कॉटवर होता. मामा भयभीत होऊन तत पप करीत चादरीची दोन्ही टोके हातात धरून उभे राहिले. चादरीने मामांचा गळ्यापर्यंतचा देह झाकला होता. जणू काय त्यानी आपले उघडे शरीर झाकण्यासाठी चादरीचा आडोसा केला होता. मामींच्या जवळची तिखटाची पुडी तशीच राहिली होती. पुडी समोर असूनही ती घेण्याचे त्यांचे धाडस होत नव्हते.

'म्हाताऱ्या, बऱ्या बोलाने चावी दे' अशी आणखी एक गर्जना चोराच्या तोंडातून बाहेर पडली. मामांच्या थरथर कापण्याने कॉट जोरात हलू लागली. कॉटच्या हलण्यामुळे मामांचा तोल जाऊ लागला. आणि आता आपले काही खरे नाही, असे मामांच्या लक्षात आले. दुसऱ्याच क्षणी मामांच्या मनात काय अवसान संचारले ते त्यांनाच माहीत! त्यांनी हातातली चादर चोराच्या तोंडावर टाकली आणि लहान मूल दोन्ही पाय आईच्या कमरेभोवती गुंडाळून जशी गळयात मिठी मारते तशी मिठी मारत मामानी चोराच्या अंगावर झेप घेतली. चोर आणि मामा दोघेही खाली कोसळले. क्षणभर काय झाले ते कळले नाही. सर्वत्र सामसूम पसरली. दरवाज्याच्या बाहेर आलेली कडी चोराच्या वर्मी बसल्याने चोर निपचीत पडला होता. मामा त्याच्या छातीवर बसून त्याला बडवत होते. मामीनी किंचाळी फोडली. ती किंचाळी ऐकून जमलेला शेजाऱ्यांचा घोळका चोराला बदडत होता. मामी तिखटाची पूड त्याच्या नाकातोंडात कोंबत होत्या. मेलेल्या सापाला चार काठ्या मारण्यात जशी मजा वाटते तसे शेजाऱ्यानी चोराला मारीत आपले हात साफ करून घेतले आणि मामा पाठक झिंदाबादच्या गर्जनेत चोराचे हातपाय बांधून त्याला पोलीसांचे स्वाधीन केले.

आणि आज असामान्य धैर्य दाखविल्याद्दल मामांचा सत्कार सुरू होता. पोलीस इन्सपेक्टरने मामांच्या शौर्याचे यथोचित कौतुक करून मामाना हार घातला. मामींची खणा नारळानी ओटी भरली.

मामा सत्काराला उत्तर देण्यासाठी उभे राहिले. मामीनी हळूच त्यांचा कोट ओढून त्याना आठवण करून दिली, ''मी सांगितले ते लक्षात आहे ना? चोराशी मी झटापट करून त्याला खाली पाडले असे सांगा नाहीतर घाबरून लटपट कापता कापता त्याच्या अंगावर पडलो असे सांगाल!'' ★★★

---

### आकाश कसे झाले?

मला मुलांचे विलक्षण आकर्षण होते. एकदा एका लहान मुलीने 'गुरुजी, आकाश कसे झाले?' असा प्रश्न केला. तिला काहीतरी उत्तर देऊन वेळ मारून नेली. पण अस्वस्थ झालो. मुलांची जिज्ञासा जबरदस्त असते. त्यांच्यासाठी काही केले पाहिजे असा निश्चय केला. रोज संध्याकाळी लहान मुलांना ८-१० मिनिटांसाठी बोलावून काही श्लोक, गोष्टी, कोडी, गाणी असे काहीतरी सांगू लागलो. रोज एक-दोन आण्याचे चणे दाणे प्रसाद म्हणून वाटत असे. हळु हळु संध्याकाळी ६ ते ७ मी जिथे असेन तिथे मुलांना गोष्टी सांगण्याचा उपक्रम सुरू केला.

**- जनार्दन गोविंद,** (पृ. ४०५), आगाशी, **'जेथे जातो तेथे...'** या आत्मकथनातून.




Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

*हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी.*

*बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक.*

**क्र. २२/२००० वर** संतोष सुधाकर पेठे, जन्म ७.८.१९७१, उंची - ५'-११'', कोकणस्थ, गोत्र - वासिष्ठ, नोकरी - ह्यूजेस टेलिकॉम, पगार - सुमारे १७,००० रु., शिक्षण - बी.कॉम, आई, वडील, १ विवाहित बहीण, **अपेक्षा -** कोणत्याही ब्राह्मण पोटजातीतील, पत्रिका बघण्याची अट नाही, नोकरी करणारी, उंची - अनुरूप, **संपर्क** - सुधाकर सदाशिव पेठे, दळवी वाडी, Off आरे रोड, गोरेगांव (पूर्व), मुंबई -४०० ०६३. दूरध्वनी - ८७४२४७४. (गीता सुधाकर पेठे, गोरेगांव, मुंबई, वामन गोविंद पृ. ७० यांची मुलगी, यांचे मार्फत)

**क्र. २३/२००० वर** यशवंत सीताराम मराठे, कपि गोत्री को ब्राह्मण, बी.कॉम, उंची - ५'-६'', घरचा शेती व डेअरी व्यवसाय पहातो, टि.व्ही., फ्रीज, गॅस, नळपाणी (विहिरीवर पंप बसवून), टेलिफोन या सर्व सुविधा, आई-वडील, धाकटी बहीण विवाहित पुण्यात, धाकटा भाऊ M.B.B.S. (गोव्यात), **अपेक्षा** - स्वजातीय, शक्यतो पदवीधर, उंची ५'-२'', दरम्यान, पत्रिका बघणे आहे. मंगळ नसावा. शेती-बागयतीची आवड/सवय असणारीस अग्रक्रम, **संपर्क** - (१) सीताराम यशवंत मराठे, मु. बिंबल, पो. खातोडे-वाळपई, गोवा ४०३ ५०६. (फोन - ०८३२-३७८१२५) (२) लक्ष्मण शंकर मराठे (मुलाचे काका) अ-२३, सुयोग सोसायटी, मुलुंड (पूर्व), मुंबई- ४०००८१. (फोन- ०२२-५६८०१०४) (लक्ष्मण शंकर, ५२०, हितगुज संपादक, यांचे मार्फत)

**क्र. २४/२००० वर** प्रशांत श्रीकृष्ण मनपाठक, जन्म - ५.१०.१९७३, वत्स गोत्र, ५'-७'', बी.कॉम, व कॉम्प्युटर डिप्लोमा (हार्डवेअर). एका कॉम्प्युटर कंपनीत नोकरी, पगार - ६००० रु., सडपातळ, गोरा, देशस्थ, शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण, मुलाला आईवडील आहेत. एकुलता एक. **अपेक्षा** - पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण शाखेची, शक्यतो नोकरी करणारी, **संपर्क** - श्रीकृष्ण काशिनाथ मनपाठक, १२०६/३२ म्युन्सिपल कॉलनी, कामत हॉटेल लेन, सेंट्रल पार्क समोर, संभाजी पार्क समोर, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११ ००४. (फोन - ५५३०३२९.) (सौ. नीलांबरी रमेश पृ. २८० यांचे मार्फत)

**क्र. २५/२००० वर** प्रसाद मनोहर हर्डीकर, ७३चा जन्म, B.A.M.S., ५'-१०'', डॉक्टरी व्यवसाय, मा. प्राप्ती - ८ ते १० हजार, कोकणस्थ ब्राह्मण, आई-वडील, १ विवाहित बहीण, १ लहान भाऊ LLB करतोय, स्वत:चे कोकणात घर, कलमाची बाग, नारळ, पोफळीची झाडे व स्वत:चा ट्रक आहे, **अपेक्षा** - कोकणात राजापूर (कोंड्ये) येथे कायम राहणारी, डॉक्टर किंवा पदवीधर, **संपर्क** - श्री. मनोहर हर्डीकर, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, मु. पो. कोंड्ये, (फोन - कोड - ०२३५३, घरचा २११४०, दवाखाना - २१२५५) (सौ. नीलांबरी रमेश पृ. २८० यांचे मार्फत)

**क्र. २६/२००० वर** संतोष दिनकर परांजपे, १०.१०.१९७०, गोत्र-विष्णुवृद्ध, कोकणस्थ ब्राह्मण, उंची ५'-४'', सुदृढ, गोरा, १२वी सायन्स नंतर ३ वर्षांचा पेंट टेक्नॉलाजीचा डिप्लोमा वसई येथे क्लासिक स्टाईल्स प्रा. लि. कंपनीत केमिस्ट लॅब इनचार्ज, पगार - ६००० रु., मुलाला आई-वडील, १ भाऊ व १ बहीण असून दोघेही विवाहित आहेत. **अपेक्षा** - पदवीधर, शक्यतो नोकरी करणारी व बाहेर गावी राहण्याची तयारी असलेली, **संपर्क** - दिनकर विष्णू मराठे, ६४८ सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, सावन शेजारी, पुणे- ४११०३०. (फोन- ४४८३६१९) (सौ. नीलांबरी रमेश, पृ. २८०, यांचेमार्फत)

**क्र. २७/२००० वधू** कु. उल्का रमेश खांबेटे, जन्म - १९.५.१९७७, कोकणस्थ ब्राह्मण, गोत्र - कपी, ५'-२'', देवगण, वृषभ रास, १०वी नंतर होमसायन्सचा ५ वर्षांचा डिग्री कोर्स व २ वर्षांचा होमिओपॅथी कोर्स, मध्यम बांधा, निमगोरा वर्ण, O+ve रक्तगट, मुलीला आई-वडील, १ विवाहित बहीण व लहान भाऊ शिकत आहे. **अपेक्षा** - पदवीधर, चांगली व निश्चित नोकरी, कोणतीही ब्राह्मण पोटशाखा, निर्व्यसनी व माणसे असलेले घर, **संपर्क** - श्री. रमेश केशव खांबेटे, ४९२ शनिवार पेठ, शनिवार पेठ पोस्ट ऑफिसच्या वर, पुणे ३०. (फोन - ४४८३६६२) (सौ. नीलांबर रमेश, पृ. २८०, यांचेमार्फत)

**क्र. २८/२००० वधू** कु. सुवर्णा गणेश पारखी, जन्म - २६.२.१९७८, देशस्थ ऋग्वेदी, गोत्र - वसिष्ठ, B.Com., M.Com व D.C.A. चालू, नोकरी - नवीन प्रकाशन, DTP ऑपरेटर (पार्ट टाईम), पगार - १००० रु., उंची ५'-३'', सडपातळ, निमगोरी, चष्मा आहे (०.५ नंबर), आई-वडील व १ विवाहित बहीण आहे, **अपेक्षा** - कोणतीही ब्राह्मण शाखा, नोकरी किंवा व्यवसाय, **संपर्क** - गणेश धुंडिराज पारखी, १३९१ शुक्रवार पेठ, नवा विष्णू चौक, संगम साडी सेंटर शेजारी, बाजीराव रोड, पुणे - २ (फोन - ४४९३८८२) (सौ. नीलांबर रमेश, पृ. २८०, यांचेमार्फत)

**क्र. २९/२००० वधू** कु. पल्लवी रघुनाथ फाटक, गोत्र - कौशीक, कोकणस्थ ब्राह्मण, जन्म - २८-१-१९७८, रंग - गोरा, सडपातळ, उंची - ५' ३'', चष्मा नाही, शिक्षण - एम्. एस्सी. पुणे विद्यापीठ २००० (वनस्पती शास्त्र) NIIT मधून C व C++ चा कोर्स चालू आहे. मुलीला आई, वडील आहेत. आई : शालेय शिकवण्या व घरकाम. वडील : CWPRS खडकवासला या संशोधन शाळेत काम करतात. थोरला भाऊ : B.E. (E & TC) नोकरी करतो. विवाह होणे आहे. **अपेक्षा** - इंजिनिअर, डॉक्टर, CA चालेल. **संपर्क** - श्री. रघुनाथ दिनकर फाटक, अे/१ किर्ती नगर नं. १, वडगाव बुद्रुक, पुणे ४११ ०४१. (फोन - ४३५१६५०.)

★★★



Marathe Pratishthan



# मी एक जबाबदार नागरिक

**- शशांक श्रीधर** (पृ. ३९६), वेंगुर्ले.

***१५ ऑगस्ट २००० रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त इनर व्हिल क्लब, सावंतवाडी तर्फे वेंगुर्ले येथील खर्डेकर महाविद्यालयात आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत १२वी कलाशाखेचा विद्यार्थी शशांक श्रीधर याने महाविद्यालयीन गटात प्रथम पारितोषिक मिळवले.***

***''स्वतःच्या कुटुंबाच्या गरजा भागवण्याबरोबरच समाजासाठीहि काहीतरी करणे ही आपली जबाबदारी आहे'' हे त्याचे विचार सर्वांनीच मनन करण्याजोगे आहेत. - संपादक.***

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे काय हा प्रश्न जसा आमच्यासमोर आहे तसाच यापूर्वी शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना देखील हाच प्रश्न भेडसावत होता. कौटुंबिक, व्यावसायिक असा वारसा असलेले फारच थोडे तरुण असतील की ज्यांनी अल्पावधीतच आपल्या जीवनात स्थैर्य प्राप्त केले आहे. उच्च गुणवत्ता प्राप्त केलेले असे अगदी हातच्या बोटावर मोजण्याइतके विद्यार्थी असतील की जे आपल्या गुणवत्तेच्या जोरावर जीवनात यशस्वी होतील. परंतु ज्या विद्यार्थ्यांना कौटुंबिक वारसा नाही, आर्थिक परिस्थिती नाही अशा अनेक विद्यार्थ्यांचे भवितव्य मात्र अंधारमय आहे.

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक क्षण न् क्षण महत्त्वाचा आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे, त्याप्रमाणे आपला निर्णय देखील अचूक असला पाहिजे. मी कला शाखेतील विद्यार्थी आहे. म्हणून त्याला अनुसरूनच मी कायद्याचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे. या व्यवसायात कोणत्याही प्रकारचे दडपण असणार नाही, भ्रष्टाचार होणार नाही, कारण हा स्वतंत्र व्यवसाय आहे.

आज आपण पाहतो कित्येक लोकांना योग्य न्याय मिळत नाही. आरोपी पुराव्या अभावी निर्दोष सुटतात. धनदांडग्यांमुळे गरिबांवर अन्याय होतो. लोकांना माहीत असलेले खुनी, दरोडेखोर पुराव्याअभावी निर्दोष सुटतात आणि समाजात दहशत निर्माण करतात. अशा समाजविघातक कृतीला रोखण्यासाठी लोकांना कायद्याची दहशत बसणे आवश्यक आहे. परंतु कायद्याची अंमलबजावणी करणारेच आज गुन्हेगारांना पाठीशी घालतात. म्हणूनच हे सर्व रोखण्यासाठी सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या तरुणांची समाजाला आज गरज आहे.

परंतु कुटुंबाकडे पूर्ण दुर्लक्ष करून स्वतःला समाजकार्यात झोकून देणे चुकीचे आहे. कुटुंब हा देखील समाजाचाच एक घटक आहे. म्हणूनच कुटुंबाच्या सर्व गरजा पूर्ण करणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. परंतु आपण समाजाचे काही देणे लागतो, ह्या गोष्टीचेही भान ठेवणे आवश्यक आहे. म्हणूनच समाजासाठी आपल्याला जेवढे शक्य असेल तेवढ्या चांगल्या गोष्टी केल्या पाहिजेत. आजच्या युवकांनी अतिशय दुर्मिळ होत चाललेल्या नोकऱ्यांच्या मागे न धावता समाजासाठी, राष्ट्रासाठी उपयुक्त व्यवसायाची तसेच स्वतःला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणाऱ्या व्यवसायाची निवड करावी.

आज टी.व्ही. वर दिसणाऱ्या चॅनलमुळे देशात चंगळवाद फोफावला आहे. खाणे, पिणे, मजा करणे हेच खरे जीवन असते अशी शिकवण टी.व्ही. वरच्या काही जाहिराती देत असतात. त्याचा प्रभाव युवकांवर होतो. त्यामुळे त्यांच्या सामाजिक जाणीवा बोथट होत आहेत. मोठ्या शहरातून मधल्या काळातील एक पिढी तर केवळ जास्त पैसे आणि भौतिक सुख-सोईच्या मागे लागून अमेरिका, इंग्लंड सारख्या देशात स्थायिक झाली आहे.

काही देशातून परकीयांना घालवा अशा मोहिमा सुरू झाल्या आहेत. मग तेच अमेरिकेत व्हायला फारसा वेळ लागणार नाही. केवळ भारतीयांनाच नव्हे तर अन्य परकीयांनाही त्यांच्या देशातून हाकलून लावल्यावर अतिशय कठीण परिस्थिती येणार आहे. म्हणून उच्च शिक्षण घेतलेल्या युवकांनी केवळ भौतिक सुखाच्या मागे न लागता देशातच राहून इथल्या लोकांना फायदा होईल, असा विचार केला पाहिजे. या देशात काय कमी आहे? मनात जर काहीतरी चांगले करून दाखविण्याची जिद्द असेल तर ती कुठेही साध्य होते.

आज कुठल्याही व्यवसायात राहून समाजाची सेवा करता येते. फक्त प्रत्येक युवकाने आपला थोडासा वेळ, थोडासा पैसा आणि आपले थोडेसे ज्ञान जर समाजातील लोकांना दिले तर भारताच्या आर्थिक, सामाजिक, जडणघडणीत २१व्या शतकातील युवकाचा वाटा नक्कीच श्रेष्ठ असणार आहे.

या सर्व जबाबदाऱ्या युवकाने यशस्वीरीत्या पार पाडल्या तर प्रत्येक युवक एक जबाबदार नागरिक बनेल यात शंकाच नाही. ★★★

### अथर्वशीर्षामुळे सत्कार

मध्यंतरी एकदा मी मुलांना अथर्वशीर्ष शिकवण्याचा उपक्रम केला. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. पालकमंडळीहि खुष. त्यांनी एका कार्यक्रमात माझा सत्कार करून मला काही भेटवस्तु दिली. त्यावेळी मला थोडे आश्चर्य वाटले. मी अनेक वर्षे गीता शिकवत असल्याचे या लोकांना काही वाटले नाही. मग या अथर्वशीर्षातच अशी काय शक्ती होती? 'गुरुजींनी आमच्या मुलांना अथर्वशीर्ष शिकवले. त्यामुळे त्यांना सहस्रावर्तनात भाग घेता येतो व दक्षणा मिळते.' या एका पालकाच्या भाषणात मला याचे रहस्य उलगडले. गीता वाचून पैसे मिळत नाहीत. म्हणून तो केवढाहि श्रेष्ठ ग्रंथ असला तरी फार तर पूजा करण्याच्या लायकीचा. पण महिम्न, नवग्रह स्तोत्र, अथर्वशीर्ष, श्रीसूक्त, पुरुषसूक्त यांची 'धनार्थी लभते धनम्' ही मुख्य फलश्रुती. जी 'अर्थ' मिळवून देत नाही ती विद्याच आम्हाला निरर्थक वाटते.

**- जनार्दन गोविंद,** (पृ. ४०५), आगाशी, **'जेथे जातो तेथे...'** या आत्मकथनातून.

Marathe Pratishthan

**मी एक मुक्त 'मधुकर'**

माझा मूळ पिंडच तत्त्व चिंतकाचा. सत्याचा शोध हेच माझे ध्येय. त्यासाठी कुठलाही पंथ, संप्रदाय, गुरू यांची कांस मी धरली नाही. मुक्त वाचन, चिंतन, प्रयोग हेच माझे घर होते. पैसा मिळवणं हे ध्येय कधीच नव्हते. जे काही मला कळे ते मी मुक्तपणे इतरांना देई. त्यामुळे मी कधीहि महाराज झालो नाही. कुठेही अडकलो नाही. शेवटी मी एक मुक्त 'मधुकर' आहे.

- **जनार्दन गोविंद,** (पृ. ४०५), आगाशी, **'जेथे जातो तेथे...'** या आत्मकथनातून.

## या अंकात


१. **पुण्यस्मरण : कै. सुरेशभाऊंचे** ........................ पृ.१

२. **कै. सुरेशभाऊ मराठे स्मृति प्रीत्यर्थ सांस्कृतिक कार्यक्रम** .. पृ.३
विनायक केशव

३. **पुण्यातील २२वा वर्धापनदिन सोहळा (२६-१-२००१)** .. पृ.६
माधव वासुदेव व सौ. नीलांबरी रमेश

४. **Career Opportunities in the Armed Forces** ..पृ.९
**Col. P. P. Marathe (Retd.)**

५. **उद्योग प्रेरणा** ........................................ पृ.९
के. आर्. डामरे

६. **निसर्गाचे शक्तिप्रदर्शन (कविता)** ........................पृ.१०
कविता मयेकर

७. **अवसान (कथा)** ........................................पृ.१२
विठ्ठल महादेव

८. **मी एक जबाबदार नागरिक** ..............................पृ.१०
शशांक श्रीधर

९. **'जेथे जातो तेथे...'**
जनता जनार्दन कृपा प्रसाद ........................ पृ.४
आकाश कसे झाले ........................ पृ.१३
अथर्वशीर्षामुळे सत्कार ........................ पृ.१५
मी एक मुक्त 'मधुकर' ........................ पृ.१६
जनार्दन गोविंद यांच्या आत्मकथनातील अवतरणे

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.८), **विवाह सहाय्य** (पृ.१४), **Self-Improvement** (पृ.८), **एकमेकां साह्य करू** (पृ.२), **संवाद** (पृ.११) आणि **खुषीपत्रे** (पृ.७,८) ही नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

**प्रति**


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(दू. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan